# १. पुणे विद्यापीठ : एक दृष्टिक्षेप

## १. परिचय :

पुणे विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली होती. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून डॉ. एम. आर. जयकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. सध्या पुणे विद्यापीठ हे भारतातील अग्रगण्य विद्यापीठ म्हणून ओळखले जाते. पुणे विद्यापीठात पुणे, अहमदनगर, नाशिक या महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांचा समावेश होतो. पुणे विद्यापीठातील महत्त्वाचे शैक्षणिक कार्यक्रम व विद्यापीठाने पुरविलेल्या सुविधांमध्ये पारंपरिक व अत्याधुनिक अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली आहे. चारशेहून अधिक शैक्षणिक कार्यक्रम विविध प्रकारे व शिस्तबद्धरीत्या पदवीधर व पदव्युत्तर पातळीवर राबविले जातात. पदव्युत्तर पातळीवर विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधनप्रक्रिया राबविण्यात येत आहे. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांची व त्यांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. विद्यापीठाचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे वाढते प्रमाण. खरे तर भारतात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुणे विद्यापीठ हे पहिल्या पसंतीचे विद्यापीठ आहे.

'नॅक'ने पंचतारांकित विद्यापीठ म्हणून गौरविल्यामुळे आणि विद्यापीठाच्या उत्कृष्ट कार्यक्षमतेमुळे University with Potential for Excellence (UPE) लाभलेली प्रतिष्ठा इत्यादी कारणांमुळेच पुणे विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या गौरवास पात्र ठरले आहे.

आज पुणे विद्यापीठ जगातील सर्वांत मोठे विद्यापीठ आहे, कारण या विद्यापीठात ५ लाख विद्यार्थी शिकत आहेत. ५७ पदव्युत्तर विभाग आणि संशोधन केंद्रे, त्याचबरोबर ६ आंतरविद्याशाखीय केंद्रे, ६१३ पदवी महाविद्यालये आणि २२८ संस्था व १९८ पदव्युत्तर केंद्रे विद्यापीठाशी संलग्न आहेत.

पुणे विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये महाराष्ट्र सरकारने व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक धोरणाच्या चौकटीत राहूनच कार्य करीत आहेत. महाराष्ट्र राज्य सरकार पुणे विद्यापीठाला तसेच विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना अनुदान देते आणि त्याचबरोबर सेवासुविधादेखील पुरविते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांचे वेतनदेखील महाराष्ट्र राज्य सरकार पुरविते. विद्यापीठ अनुदान आयोगाने बहुतांश संलग्न महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने पुरविलेले संशोधन अनुदान तसेच इतर संस्थांनी पुरविलेले अनुदान उदा., वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन केंद्र ( सी.एस.आय.आर.), जैविक तंत्रज्ञान विभाग(डी.बी.टी.), अणुऊर्जा विभाग (डी.ए.ई.), भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो), भाभा अणुऊर्जा संशोधन केंद्र (बी.ए.आर.सी.), आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभाग(डी.एस.टी.), भारत सरकार, ह्यांचा विकासास हातभारच लागला आहे.

## २. अ) ध्येये :

या ध्येयानुसार पुणे विद्यापीठाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

- अध्यापन, संशोधन आणि विस्तारित उपक्रमांसाठी चैतन्यपूर्ण ज्ञानकेंद्र आणि उत्कृष्ट गुणवत्तेचे केंद्र बनणे.
- ज्ञानाचे संरक्षण, निर्मिती, प्रगती आणि प्रसार घडवणे.
- मूल्याधिष्ठित आणि उच्च दर्जाचे शिक्षण, अत्याधुनिक संशोधन आणि सामाजिक व प्रादेशिक घटकांना स्थान व प्रतिष्ठा या गोष्टी साध्य करून विविध क्षेत्रांत तंत्रज्ञानाची जाण असलेले वैचारिक आणि कृतिशील नेतृत्व घडवणे.
- आंतरराष्ट्रीय पातळीवरील विद्यार्थ्यांना आकर्षित करून आणि नामवंत शैक्षणिक संस्थांच्या सहकार्यातून शैक्षणिक उपक्रम राबवून जागतिक संपर्क वाढविणे.

## ब) उद्दिष्टे :

''पुणे विद्यापीठाने ज्ञानाचे संरक्षण, निर्मिती, प्रगती आणि प्रसार या दृष्टींनी जागतिक दर्जाचे आणि सामाजिक जाणीवयुक्त उत्कृष्ट गुणवत्तेचे केंद्र बनावे असे आमचे ध्येय आहे. सभोवती घडणाऱ्या विशाल परिवर्तनांतून निर्माण होणारी आव्हाने पेलण्यासाठी सक्षम बनणे हे आमचे उद्दिष्ट आहे. देशाच्या आर्थिक, तंत्रज्ञानातील आणि सामाजिक विकास व प्रगतीमध्ये भरीव योगदान करण्यासाठी आमच्या शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना समर्थ बनविणे ही आम्ही आमची बांधिलकी मानतो.''

## ३. पुणे विद्यापीठाचे बोधचिन्ह :

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी साम्राज्याचे सत्ताधीश असलेल्या पेशवे ह्यांचा राजवाडा पुणे विद्यापीठाच्या कमलाकार - बोधचिन्हाच्या मध्यभागी आहे. बोधचिन्हाच्या तळाच्या दोन्ही कोपऱ्यांतील मराठी साम्राज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला आणि पुण्यातील सगळ्यात महत्त्वाची पवित्र आणि ऐतिहासिक वास्तू असलेली पर्वती यांचा समावेश केलेला आहे. दोन एकमेकींच्या विरुद्ध दिशेत तलवारी मांडलेल्या असून त्यांच्या बाजूंना दोन हत्तींची डोकी आणि लेखण्या आहेत. शनिवारवाड्याच्या दोन्ही बाजूंना दोन उभ्या घोड्यांनी उघडे पुस्तक धरले असून त्यावर 'पुणे विद्यापीठ' आणि १९४८ हे स्थापना वर्ष कोरलेले आहे. पुस्तकाच्या खाली दोन्ही कोपऱ्यांत दोन स्वस्तिके असून बोधचिन्हाच्या तळाशी 'य: क्रियावान् स पण्डित:' हे विद्यापीठाचे बोधवाक्य लिहिलेले आहे. '।। य: क्रियावान् स पण्डित: ।।' म्हणजे जिथे तुमची कृती तुमचे ज्ञान सिद्ध करते. विद्यापीठाचे बोधवाक्य या क्रियावान् शब्दावर अधिक भर देते. क्रियावान् म्हणजे जो क्रिया करण्यासाठी धाडस करतो, आणि जो समाजाच्या उत्कर्षासाठी कार्य करतो, तो खरा पंडित असतो.

## ४. प्रशासन आणि व्यवस्थापन :

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार पुणे विद्यापीठाचे प्रशासन चालते. कायद्याप्रमाणे विद्यापीठाचे प्रशासन आणि व्यवस्थापन पुढील अधिकाऱ्यांच्या आणि व्यवस्थापन मंडळांच्या अखत्यारीत चालते.

**विद्यापीठ कार्यालयीन अधिकारी :**

१. मा. कुलगुरू
२. मा.उपकुलगुरू
३. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (BCUD)
४. कुलसचिव
५. परीक्षा नियंत्रक
६. वित्त व लेखा अधिकारी

**व्यवस्थापन मंडळ :**

१. व्यवस्थापन परिषद
२. विद्या परिषद
३. अधिसभा
४. विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता

## ५. विद्यापीठ परिसर :

विद्यापीठाचा एकूण परिसर ४११ एकरांचा असून त्यास अतिशय दुर्मिळ, सुंदर आणि चित्रपूर्ण वातावरण लाभले आहे. घनदाट हिरवळ, शोभिवंत कारंजे आणि पुणे विद्यापीठाची दिमाखदार भव्य इमारत, इत्यादी गोष्टी निसर्गप्रेमी, चित्रपट निर्माते, संगीतकार आणि ख्यातनाम लोकांचे आकर्षण केंद्र आहे. विद्यापीठाचा संपूर्ण परिसर असंख्य जुन्या वृक्षांनी व्यापलेला आहे. या वृक्षांची छाया, सौंदर्य आणि उत्साह निर्माण करणारे वातावरण विद्यार्थ्यांना अभ्यास व संशोधन करण्यासाठी नेहमी प्रोत्साहित करीत असते. पुणे विद्यापीठाने रास अल् खैमा (संयुक्त अरब अमिराती ) येथे आपली शाखा सुरू केली असून, २००९ पासून विद्यापीठाने तेथे ई-एम.बी.ए.आणि एम.बी.ए.चे अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

### ५.१ मुख्य इमारत :

पुणे विद्यापीठाची मुख्य इमारत ही विद्यापीठाचे प्रतीक म्हणून ओळखली जाते. वास्तुकलेचा एक सुंदर नमुना असणाऱ्या या ऐतिहासिक इमारतीच्या आकाशाकडे भरारी घेणाऱ्या मनोऱ्यावर विद्यापीठाचा ध्वज फडकत असतो. विद्यापीठाच्या या इमारतीत मा. कुलगुरूंचे कार्यालय, अधिष्ठाता कक्ष आणि दस्तावेज विभाग

आहेत. विविध शैक्षणिक मंडळांच्या सभा ह्या मुख्य इमारतीतील यशवंतराव चव्हाण सभागृह, संत ज्ञानेश्वर सभागृह, शिवाजी सभागृह आणि संत गाडगे महाराज सभागृह या चार प्रतिष्ठित व वैभवशाली सभागृहांत होतात. मुख्य इमारतीचे मूळ वैभव जपण्यासाठी इमारतीच्या बांधकामाची काळजीपूर्वक सुधारणा सुरू आहे.

### ५.२ इतर इमारती :

विद्यापीठाच्या परिसरात भव्य व महत्त्वाच्या अशा अनेक इमारती आहेत. उदा. प्रशासकीय इमारत, सेट भवन, विविध पदव्युत्तर विभागांच्या इमारती, विद्यार्थी कल्याण मंडळ, स्पर्धा परीक्षा केंद्र, जयकर ग्रंथालय, खेर वाङ्मय् भवन, मुद्रणालय, मुलांची व मुलींची वसतिगृहे, अनेक उपाहारगृहे, आरोग्य क्रेंद्र आणि भोजनालय, इत्यादी (विद्यापीठ आवाराचा नकाशा पहा). मास कम्युनिकेशन विभागासाठी नवीनच इमारत बांधण्यात आली असून वाणिज्य शाखेसाठीसुद्धा नवीन इमारत बांधण्यात आली आहे.

### ५.३ जयकर ग्रंथालय :

जयकर ग्रंथालय हे भारतातील संदर्भ व माहिती ग्रंथांसाठीचे सर्वोत्कृष्ट ग्रंथालय आहे. जयकर ग्रंथालयात भारतीय आणि विदेशी मासिके घेतली जातात. ही मासिके विविध विषयांवरील आहेत. ग्रंथालयात ४,७८,७७४ पुस्तकांहून अधिक पुस्तके आहेत. महाविद्यालयांना, संस्थांना आणि शासकीय संस्थांना आंतरग्रंथालयीन सेवा जयकर ग्रंथालयातर्फे पुरविण्यात येते. जयकर ग्रंथालयात प्राचीन भारताची संपत्ती असणारी अनेक पुस्तके, हस्तलिखिते संगणकीकृत करून ठेवली आहेत. तसेच, डिजिटल पद्धतीचे व्यवस्थापन कार्यान्वित करण्याचे काम सुरू असून कार्यकारी व व्यवस्थापन मंडळांचा अहवाल स्कॅनिंग करण्याच्या प्रकियेत आहेत.

### ५.४ वसतिगृहे, अतिथिगृहे आणि कर्मचाऱ्यांची निवासस्थाने :

विद्यापीठात मुलांची आठ वसतिगृहे आणि मुलींची आठ वसतिगृहे असून, त्यांत २१८९ हून अधिक विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्यात आली आहे. वसतिगृहे सर्व सुविधांनी युक्त आहेत. अतिथिगृहात ३४ खोल्या तसेच भोजनकक्षसुद्धा उपलब्ध आहे. नव्याने बांधण्यात आलेल्या सेट भवन अतिथिगृहात १६ एकेरी व १६ दुहेरी खोल्या आहेत. विद्यापीठाच्या आवारात ११५ प्राध्यापकांसाठी तसेच २९४ प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची व्यवस्था आहे. सर्व सोयीसुविधांमध्ये वेळोवेळी सुधारणा करून त्या जतन केल्या जातात.

### ५.५ भोजनगृह :

समाजशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र विभागाच्या मध्यभागी एक भोजनगृह चालविण्यात येते. स्वच्छ, पौष्टिक आणि माफक दरात येथे जेवण मिळते. या भोजनगृहाव्यतिरिक्त परिसरात ठिकठिकाणी उपाहारगृहांचीही व्यवस्था आहे. त्यांत उपाहाराचे व इतर खाद्यपदार्थ उपलब्ध असतात. ही उपाहारगृहे सकाळपासून संध्याकाळपर्यंत सुरू असतात.

**५.६ क्रीडासंकुल :**

विद्यापीठाच्या परिसरात बास्केटबॉल, हॉलीबॉल कोर्ट, क्रिकेट व फुटब्ॉलचे मैदान, व्यायामशाळा, पोहण्याचा तलाव आणि क्रीडा वसतिगृह, चार भव्य सभागृहे व एक ॲम्फिथिएटरची व्यवस्था आहे. मैदानी खेळ व बंदिस्त जागेतील खेळ या दोन्ही प्रकारांच्या खेळांचा या क्रीडासंकुलात अंतर्भाव केला आहे. त्यात भारतीय, युरोपीयन खेळ व धावण्याच्या शर्यती यांचा समावेश आहे. साधारणत: ८० स्त्री व पुरुष खेळाडूंची राहण्याची व्यवस्था परिसरात आहे. योजना अधिक विस्तृत करण्याचेही प्रयत्न सरू आहेत. क्रिकेट व फुटबॉलची मैदाने नैसर्गिक वाटावीत अशा हिरवळीसह नव्याने तयार करण्यात आलेली आहेत. बंदिस्त जागेतील खेळांसाठी सुविधा व ऑलिंपिकच्या आकाराचा पोहण्याचा तलाव तयार करण्याचे काम सुरू आहे.

**५.७ विद्यार्थ्यांना उपयुक्त सुविधा :**

विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी आणि सेवकवर्ग यांच्यासाठी आरोग्यकेंद्राची सुविधा उपलब्ध आहे. ईसीजी, डोळे तपासणी व इतर तपासण्यांसाठी खास तज्ज्ञ डॉक्टर्स आरोग्यकेंद्रास भेटी देत असतात. अत्यावश्यक सेवेसाठी रुग्णवाहिका व निवासी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध आहेत. भित्तिपत्रके व इतर लेखनसुविधांच्या माध्यमांतून एड्स, कर्करोग, धूम्रपान, मद्यपान, रक्तदान, इत्यादींसंबंधीची जाणीव करून देणारी माहिती दिली जाते. १९९९ पासून सुरू झालेल्या मदत केंद्राच्या माध्यमातून लैंगिकतेविषयी व त्यातून निर्माण होणाऱ्या एड्ससारख्या महाभयानक रोगांविषयी माहिती दिली जाते. शारीरिक क्षमता व तंदुरुस्ती तपासणी केंद्र २००२ पासून सुरू करण्यात आले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्यातून २००२ पासून विद्यापीठ योगशिक्षण केंद्रही सुरू केले आहे.

**५.८ जॉगिंग ट्रॅक :**

सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने १९९९ साली पुणे विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरू होणारा एक आकर्षक जॉगिंग ट्रॅक तयार करण्यात आला.दररोज पहाटे अनेक लोक येथे फिरायला येतात.

**५.९ बसव्यवस्था :**

शहराच्या अनेक महत्त्वाच्या ठिकाणांना जोडणारी बसव्यवस्था विद्यापीठातून उपलब्ध आहे.

**५.१० बँक आणि टपालसेवा :**

बँक ऑफ महाराष्ट्रची सुविधा विद्यापीठाच्या प्रशासकीय भवनात असून, तेथून विद्यापीठाचे अनेक वित्तव्यवहार चालतात. सर्व पारंपरिक व आधुनिक सुविधांसह टपालव्यवस्थाही परिसरात आहे.तसेच दूरसंचारव्यवस्थाही परिसरात ठिकठिकाणी उपलब्ध आहे.

**५.११ रोजगार माहिती आणि मार्गदर्शन क्रेंद्र :**

विद्यापीठाने सुरू केलेल्या रोजगार योजनांमुळे नोकरीच्या शोधात असणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांना मदत मिळते. स्वयंरोजगार योजनेतून स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी हे केंद्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करते. रोजगारासंबंधी भारतात आणि परदेशांत उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्त्या व फेलोशिप्स यांच्याबद्दल माहिती पुरविण्याचे कामही या केंदामार्फत केले जाते.

**५.१२ आंतरराष्ट्रीय केंद्र :**

आंतरराष्ट्रीय केंद्रामार्फत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व आंतरराष्ट्रीय आदान प्रदान सुविधा केंद्र चालविण्यात येते. अधिक माहितीसाठी आंतरराष्ट्रीय केंद्र हा विभाग पाहावा.

**५.१३ इतर सुविधा :**

माहिती आणि तंत्रज्ञान पार्क, वायरलेस इंटरनेट सुविधा, टेलिफोन व्यवस्था, झेरॉक्स व स्कॅनिंग, व्हिडिओ सुविधा, इत्यादी अत्यावश्यक सुविधा विद्यापीठाच्या परिसरात उपलब्ध आहेत.

**५.१४ मुद्रणालय :**

विद्यापीठाचे स्वत:चे स्वतंत्र मुद्रणालय असून तेथे विद्यापीठाचे छपाईचे व प्रकाशनाचे कामकाज चालते. १९५० साली या मुद्रणालयाची स्थापना झाली असून, त्यात आवश्यक मशिनरीज व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती असलेला सेवकवर्ग कार्यरत आहे. मुद्रणालयात वळोवेळी आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असलेली नवीन यंत्रे विकत घेतली जातात आणि मुद्रणालय अधिकाधिक अत्याधुनिक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात.

**५.१५ मध्यवर्ती कार्यशाळा :**

१९६२ साली स्थापन झालेल्या या मध्यवर्ती कार्यशाळेमध्ये मेकॅनिकल विभाग, ग्लास ब्लोइंग विभाग, एसी व रेफ्रिजरेटर दुरुस्ती विभाग, सुतारकाम विभाग, फोटोग्राफ सुविधा यांचा समावेश आहे.

**५.१६ नवीन अभ्यासक्रम आणि विद्याशाखा :**

औद्योगिक काळाची गरज भागविण्याच्या दृष्टीने शैक्षणिक अभ्यास तयार करण्यात आला आहे. त्यात विद्यापीठाने नवीनच एम.बी.ए.++ अभ्यासक्रम जुन्या एम.बी.ए.अभ्यासक्रमाच्या जागी २००७-०८ पासून नेमला आहे. काळाच्या गरजा लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रमाची रचना विविध औद्योगिक क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या सल्लामसलतीने तयार करण्यात आली आहे. ह्या दुर्मिळ अभ्यासांतर्गत ३० संयुक्त विषय उपलब्ध असून विद्यार्थ्यांना विषयनिवडीचे संपूर्ण स्वातंत्र्य आहे. पाच विशिष्ट विषयांपैकी एक अणि सहा स्वतंत्र सेक्टरपैकी एक अशी विषयनिवड विद्यार्थ्यांना घेता येते.२००८-०९ पासून नोकरी करणाऱ्यांसाठी व्यावसायिक एम.बी.ए. या अभ्यासक्रमाची व्यवस्था करण्यात आली आहे.त्याचप्रमाणे एम.टेक.(बायोइन्फर्मेटिक), एम.ए.(मास रिलेशन्स), एम.लिब. सायन्स ( इन्फर्मेशन सायन्स ) हे नवे अभ्यासक्रमही सुरू करण्यात आलेले आहेत.२००७-०८ पासून स्वतंत्र वाणिज्य शाखा सुरू करण्यात आली असून विद्यापीठ आवारात वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर अध्यापनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शारीरिक शिक्षणशास्त्र ही स्वतंत्र

विद्याशाखा निर्माण करण्यात आली असून, विद्यापीठ आवारात प्रथमच शारीरिक शिक्षणशास्त्र विभाग स्थापन करण्यात आला आहे.

## ६. शैक्षणिक कार्यक्रम :

विद्यापीठात एकूण १३ विद्याशाखा कार्यरत असून त्यांत उच्च शिक्षणातील विविध विषयांचा समावेश आहे. या विद्याशाखांच्या अंतर्गत विद्यापीठात पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जातो. अधिक माहितीसाठी संबंधित विभागांशी, कुलसचिव कार्यालयाशी संपर्क साधता येतो. त्यासंबंधीच्या पात्रतेविषयीच्या माहितीसाठी विद्यापीठ वेबसाइट www.unipune.ac.in पहा.

**विद्याशाखा**

१) कला, ललितकला व प्रयोगजीवीकला विद्याशाखा
२) मानस, नीती आणि समाजविज्ञान विद्याशाखा
३) विज्ञान विद्याशाखा
४) वाणिज्य विद्याशाखा
५) व्यवस्थापन विद्याशाखा
६) अभियांत्रिकी विद्याशाखा
७) शिक्षणशास्त्र विद्याशाखा
८) शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
९) विधि विद्याशाखा
१०) औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा
११) वैद्यक विद्याशाखा
१२) आयुर्वेद विद्याशाखा
१३) होमिओपॅथी विद्याशाखा

**नियमित शैक्षणिक कार्यक्रम :**

**१) कला, ललितकला व प्रयोगजीवीकला विद्याशाखा**

**१. पदवी**

प्रयोगजीवीकला शाखेतील पदवी

ललितकला शाखेतील पदवी

बुद्धिस्ट स्टडीज प्रगत प्रमाणपत्र

बुद्धिस्ट स्टडीजची प्रगत पदविका

बुद्धिस्ट स्टडीजची उच्च पदविका

बुद्धिस्ट स्टडीजमधील पदव्युत्तर पदविका

**२. पदव्युत्तर पदवी**

कलाशाखेची पदव्युत्तर पदवी

संस्कृत भाषाविज्ञानातील पदव्युत्तर पदवी

प्रयोगजीवीकलेतील पदव्युत्तर पदवी

**३. पदविका/प्रमाणपत्र**

संस्कृत भाषाविज्ञानातील पदव्युत्तर पदविका

भारतीय तर्कशास्त्र आणि एपिस्टेमॉलॉजीमधील पदव्युत्तर पदविका

पालीमधील पदव्युत्तर पदविका

फ्रेंच /जर्मन/ रशियन /जापनीज/ स्पॅनिशमधील पदविका

उर्दूमधील पदविका

जर्मन भाषांतरातील विशेष पदविका

व्यावहारिक जर्मनमधील विशेष पदविका

रशियन भाषेतील विशेष पदविका

व्यावहारिक फ्रेंच भाषेतील विशेष पदविका

फ्रेंचमधील इंटेन्सिव्ह प्रमाणपत्र अभ्यासक्रम

इंग्रजी साहित्यातील प्रमाणपत्र/पदविका आणि प्रगत पदविका

फ्रेंच /जर्मन /रशियन /जापनीजमधील प्रगत पदविका

हस्तलिखितशास्त्रातील प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**२) मानस, नीती आणि समाजविज्ञान विद्याशाखा**

**१. पदवी**

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील पदवी

**२. पदव्युत्तर पदवी**

कला शाखा

कला शाखा (गणित)

संज्ञापनशास्त्र आणि पत्रकारिता

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

सामाजिक कार्य

जनसंपर्क

कला व समाज अभ्यासातील पदव्युत्तर पदवी

विकास, नियोजन आणि प्रशासन

शालेय मानसशास्त्र

परदेशी व्यापार

वित्तीय आणि गुंतवणूक व्यवस्थापनशास्त्र

विमा आणि वित्तसेवा

मानव संसाधन विकास

**३. पदविका / प्रमाणपत्र**

लोकप्रशासन प्रमाणपत्र

समाजकार्य

जमात विकास

ग्रामीण विकास

औद्योगिक मानसशास्त्र

बाल आणि कुटुंब समुपदेशन

पत्रकारिता

पर्यटन

तत्त्वज्ञान

भारतीयशास्त्र

भारतीय नाणे व पदके

मध्ययुगीन भारतीय अभ्यास आणि पुरातत्त्वशास्त्र

बालमार्गदर्शन

आपत्कालीन व्यवस्थापनशास्त्र

चिकित्सा व सल्ला मानसशास्त्र

भौगोलिक नकाशाशास्त्र

**३) विज्ञान विद्याशाखा**

**१. विज्ञान विद्याशाखेतील पदवी बी.एस्सी.**

रसायनशास्त्र

जीवशास्त्र

सूक्ष्मजीवशास्त्र

प्राणिशास्त्र

संगणकशास्त्र

भूगोल

गणित

संख्याशास्त्र

भौतिकशास्त्र

भूगर्भशास्त्र

जैवतंत्रज्ञान

**२. बी.एस्सी.नंतरचे अभ्यासक्रम (बी.एस्सी. ॲप्लाईड)**

संगणकशास्त्र

जैवतंत्रज्ञान

जैवआरोग्यतंत्र

ॲनालिटिकल केमिस्ट्री

ऑप्टॉमेट्री

भौगोलिक माहिती पद्धती आणि रिमोट सेन्सिंग तांत्रिक शस्त्रास्त्र पद्धती

**३) विज्ञान शाखेतील पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी.)**

जैवतंत्रज्ञान

अवकाशशास्त्र

पर्यावरणशास्त्र

गणित

पॉलिमर सायन्स

आरोग्यशास्त्र

पेट्रोलियम टेक्नॉलॉजी

संगणकशास्त्र (विद्यापीठातील विभाग)

संगणकशास्त्र (संलग्न महाविद्यालयांतील)

संगणकशास्त्र (आंतरविद्याशाखा शास्त्रीय संगणक)

आम्लजन्य रसायनशास्त्र

पी.पी.पी.आर.टेक. वेपन सिस्टीम

जैवतंत्रज्ञान (पाच-वर्षीय अंतर्गत अभ्यासक्रम)

**४. तंत्रज्ञानातील पदव्युत्तर पदवी (एम.टेक.)**

वातावरणातील भौतिकशास्त्र

लेझर्स अ‍ॅण्ड इलेक्ट्रॉनिक ऑप्टिक्स

कॉम्प्यूटर अ‍ॅप्लिकेशन्स

संगणकशास्त्र

मॅथेमॅटिकल मॉडेलिंग अ‍ॅण्ड सिम्युलेशन

जैवमाहिती

इंडस्ट्रिअल मॅथेमॅटिक्स विथ कॉम्प्यूटर अ‍ॅप्लिकेशन्स

जैवतंत्रज्ञान (सहा-वर्षीय अभ्यासक्रम)

**५. पदविका / प्रमाणपत्र**

सर्टिफिकेट कोर्स इन् व्ही.एल.एस.आय. डिझाइन, एम्बेडेड सिस्टीम डिझाइन अ‍ॅण्ड

अ‍ॅड्व्हान्स्ड डिजिटल सिग्नल प्रोसेसिंग

डिप्लोमा इन् वेपन सिस्टीम टेक्नॉलॉजी

डिप्लोमा इन् व्हेइकल सिस्टीम टेक्नॉलॉजी

अ‍ॅड्व्हान्स्ड डिप्लोमा इन् बायोइन्फर्मेटिक्स

आहारशास्त्रातील पदव्युत्तर पदविका

पोस्टग्रॅज्युएट डिप्लोमा इन् इन्फंट्री कॉम्बॅट व्हेइकल (आय.सी.व्ही.)

टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड कॉम्बॅट अ‍ॅप्लिकेशन (आय.सी.व्ही.टी.सी.ए.)

डिप्लोमा इन् कम्युनिकेशन सिस्टीम्स टेक्नॉलॉजी

**४) वाणिज्य विद्याशाखा**

**१. पदवी**

वाणिज्य विद्याशाखेतील पदवी (बी.कॉम.)

उद्योग व्यवस्थापनशास्त्रातील पदवी (बी.बी.ए.)

बॅचलर ऑफ कॅाम्प्यूटर अ‍ॅप्लिकेशन (बी.सी.ए.)

**२. पदव्युत्तर पदवी**

वाणिज्य पदव्युत्तर पदवी (एम.कॉम.)

**३. पदविका/प्रमाणपत्र**

कंपनी सेक्रेटरीशिपची पदव्युत्तर पदविका

विक्रेता आणि जाहिरात

संख्याशास्त्र

टॅक्सेशन

बँकिंग अँण्ड फायनान्स

अकौंटन्सी

आंतरराष्ट्रीय उद्योग

सेक्रेटरीशिपमधील पदविका

टॅक्सेशन

ई–कॉमर्स

**५) व्यवस्थापन विद्याशाखा**

**१. पदवी**

बॅचलर ऑफ सायन्स हॉस्पिटॅलिटी स्टडीज (बी.एस्सी.एच.एस.)

हॉटेल व्यवस्थापन पदवी

हॉटेल व्यवस्थापन आणि केटरिंग टेक्नॉलॉजी पदवी (एक वर्ष)

**२. पदव्युत्तर पदवी**

उद्योग प्रशासन

एम.बी.ए. बायोटेक्नॉलॉजी

एम.बी.ए. (एक्झिक्युटिव्ह प्रोग्रॅम)

मनुष्यबळ व्यवस्थापन

व्यवसाय अध्ययन

संगणक व्यवस्थापन (प्रथम वर्ष)

संगणक व्यवस्थापन ( द्वितीय वर्ष)

विक्री व्यवस्थापन (एम.एम.एम.)

कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन (प्रथम वर्ष)

कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन (द्वितीय वर्ष)

कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन (तृतीय वर्ष)

**३. पदव्युत्तर पदविका**

उद्योग व्यवस्थापन पदविका

संगणक व्यवस्थापन पदविका

विक्री व्यवस्थापन पदविका

हॉस्पिटल व्यवस्थापन पदविका

कॅपिटल मार्केटिंग व्यवस्थापन पदविका

वित्तसेवा पदविका

पर्यावरण व्यवस्थापन पदविका

कॉम्प्यूटर ॲप्लिकेशन पदविका

कार्यालय व्यवस्थापन पदविका

सहकारी व्यवस्थापन पदविका

मुद्रण प्रशासन पदविका

**६) अभियांत्रिकी विद्याशाखा**

**१. अभियांत्रिकीमधील पदवी**

अर्धवेळ पदवी

(सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन)

मुद्रण प्रशासन पदविका (प्रिंटिंग टेक्नॉलॉजी)

**२. वास्तुविशारद पदवी**

**३. अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी एम.ई.**

इलेक्ट्रिकल

सिव्हिल

इलेक्ट्रॉनिक्स/इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन

इन्स्ट्रुमेंटेशन ॲण्ड कंट्रोल

मेकॅनिकल ॲण्ड मेकॅनिकल सॅण्डविच

प्रॉडक्शन ॲण्ड प्रॉडक्शन सॅण्डविच

संगणक

केमिकल

पेट्रोलिअम

इंडस्ट्रिअल

एम.सी.ए.अभियांत्रिकी

एम.बी.ए.

मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, कॉम्प्यूटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग

इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी

मेटॅलर्जी

**७ व ८) शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र विद्याशाखा**

**१. शिक्षणशास्त्र पदवी (बी. एड.)**

शारीरिक शिक्षणशास्त्र

हिअरिंग इम्पेअर्ड

शारीरिक शिक्षण, आरोग्य शिक्षण आणि खेळ
शारीरिक शिक्षण (बी.पी.एड.)(तीन वर्ष)
शारीरिक शिक्षण ( एक वर्ष)
योगा ( एक वर्ष)
व्होकेशनल ( दोन वर्ष)
अपंगांसाठी शिक्षण ( एक वर्ष)
हिअरिंग इम्पेअर्ड ( एक वर्ष)

**२.शिक्षणशास्त्र पदव्युत्तर पदवी**

शारीरिक शिक्षण
शारीरिक शिक्षण सप्लिमेंटरी

**३. स्पेशल डिप्लेमा इन् एज्युकेशन हिअरिंग इम्पेअर्ड**

स्पोर्ट्स जर्नालिझम डिप्लोमा
आरोग्य शिक्षण पदविका

**४. डॉक्टर ऑफ सायन्स (डी. एस्सी.)**

डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.)
पीएच.डी. इन् एज्युकेशन इंटरडिसिप्लिनरी ( एक वर्ष)
मास्टर ऑफ फिलॉसॉफी (एम.फिल.) (एक वर्ष)
आंतरविद्याशाखीय शिक्षण (एक वर्ष )
एम.फिल.शारीरिक शिक्षण (एक वर्ष नियमित)
एम.फिल.शारीरिक शिक्षण (दोन वर्ष व्होकेशनल)
शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम.एड.)(एक/दोन वर्ष)
शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (अर्धवेळ दोन वर्ष)
शारीरिक शिक्षणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम.एड.)(दोन वर्ष)
आंतरविद्याशाखीय शिक्षणातील पदव्युत्तर पदवी (एक वर्ष)
कला, शिक्षण आंतरविद्याशाखीय शिक्षणातील पदव्युत्तर पदवी (दोन वर्ष)
संशोधनपद्धती आणि शिक्षण – पदव्युत्तर पदविका ( एक वर्ष)
डिप्लोमा इन् एज्युकेशन फॉर डीफ ( एक वर्ष)
डिप्लोमा इन् एज्युकेशन फॉर टीचर्स ऑफ मेंटली रिटायर्ड चिल्ड्रेन ( एक वर्ष)
आरोग्य शिक्षण पदाविका ( एक वर्ष)
डिप्लोमा इन् स्पोर्ट्स जर्नालिझम ( एक वर्ष)
स्पेशल ट्रेनिंग फॉर टीचर्स ऑफ मेंटली रिटार्डेड पर्सन्स
सर्टिफिकेट इन् ट्रेनिंग ऑफ ॲडल्ट एज्युकेशन मिडल लेव्हल फंक्शनरीज

(ॲनिमेटर्स ॲण्ड सुपरव्हायझर्स)

स्पेशल डिप्लोमा इन् एज्युकेशन हिअरिंग इम्पेअर्ड ( एक वर्ष)

बॅचलर ऑफ आर्ट्स, बॅचलर ऑफ एज्युकेशन इंटेग्रेटेड कोर्स (चार वर्ष)

**ॲडिशनल कोर्सेस (२००४-०५) :**

ॲड्व्हान्स्ड सर्टिफिकेट कोर्स इन् रिसर्च मेथडॉलॉजी ॲण्ड स्टॅटिस्टिकल मेथड्स

सर्टिफिकेट कोर्स इन् कम्युनिकेशन इंग्लिश

सर्टिफिकेट कोर्स इन् जिम्नॅसियम इन्स्ट्रक्शन

बॅचलर ऑफ एज्युकेशन, इंग्लिश एज्युकेशन

**९) विधि विद्याशाखा**

**१. विधि पदवी (तीनवर्ष पदवी)**

बॅचलर ऑफ सोशल सायन्स ॲण्ड लिगल सायन्स बी.एस.एल. (पाच वर्ष पदवी)

**२. विधि पदव्युत्तर पदवी**

मास्टर ऑफ लेबर लॉ ॲण्ड लेबर वेल्फेअर(एम.एल.एल. ॲण्ड एल.डब्ल्यू.)

**३. डिप्लोमा इन् ह्यूमन राइट्स**

सायबर लॉज

कन्झ्यूमर प्रोटेक्शन लॉज

इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइट लॉज

टॅक्सेशन लॉज (डी.टी.एल.)

लेबर लॉज ॲण्ड लेबर वेल्फेअर

को-ऑपरेटिव्ह लॉज

क्रिमिनॉलॉजी

लेजिस्लेटिव्ह ड्राफ्टिंग

**४. सर्टिफिकेट कोर्स इन् फॉरेन्सिक ॲण्ड मेडिकल ज्युरिस्प्रूडन्स**

**१०. औषधनिर्माणशास्त्र विद्याशाखा**

**१. पदवी**

बॅचलर ऑफ फार्मसी

**२. पदव्युत्तर पदवी**

मास्टर ऑफ फार्मसी

**११) वैद्यक विद्याशाखा**

मास्टर डिग्री इन् मेडिसिन :

डॉक्टर ऑफ मेडिसिन (एम.डी.) इन् ऑल ब्रँचेस

मास्टर ऑफ सर्जरी (एम.एस.)

डॉक्टर ऑफ मेडिसिन (एम.डी.)

कार्डिऑलॉजी

नेफ्रॉलॉजी

न्युरॉलॉजी

मास्टर ऑफ सिरर्जिक (एम.सीएच.)

कार्डिओ व्हॅस्क्युलर अॅण्ड थोरॅसिक सर्जरी

युरॉलॉजी

न्युरो सर्जरी

पेडिआट्रिक सर्जरी

प्लॅस्टिक अॅण्ड रिकन्स्ट्रक्टिव्ह सर्जरी

मास्टर ऑफ हॉस्पिटल अॅड्मिनिस्ट्रेशन

अॅनाटोमी

फिजिऑलॉजी

मेडिकल बायोकेमिस्ट्री

मेडिकल मायक्रोबायॉलॉजी

फार्माकोलॉजी

जेनेटिक सायन्सेस

डेंटल सर्जरी (एम.डी.एस.)

फिजिओथेरपी (एम. फिजिओथेरपी)

डिप्लोमा इन् ऑल ब्रँचेस

**१२) आयुर्वेद विद्याशाखा**

पदव्युत्तर पदवी ( आयुर्वेद वाचस्पती)

**१३) होमिओपॅथी विद्याशाखा**

**१. पदवी**

बी.एच.एम.एस.

**२. पदव्युत्तर पदवी**

एम.डी.( होमिओपॅथी )

**व्यवसायाभिमुख शिक्षण :**

१९९४-९५ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक सहकार्यातून पुणे विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान पदवीच्या प्रथम वर्षापासून व्यवसायाभिमुख शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला. यामार्फत विद्यार्थ्यांना व्यवसायातील विशेष कौशल्ये, रोजगार व उद्योजकतेविषयी प्रशिक्षण दिले जाते.

चार विद्याशाखांमधील व्यावसायाभिमुख विषय पुढीलप्रमाणे आहेत :

| **विद्याशाखा क्षेत्र** | **विषय** |
|---|---|
| कला, मानव्यशास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे : | १. हिंदीचे व्यावहारिक ज्ञान<br>२. संस्कृतचे व्यावहारिक ज्ञान<br>३. इंग्रजीचे व्यावहारिक ज्ञान<br>४. पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालयशास्त्र |
| वाणिज्य, अर्थशास्त्र आणि व्यवस्थापन : | १. प्रिन्सिपल्स ॲण्ड प्रॅक्टिसेस ऑफ इन्शुरन्स<br>२. ॲक्च्युरिअल सायन्स<br>३. ऑफिस मॅनेजमेंट ॲण्ड सेक्रेटरिअल प्रॅक्टिस<br>४. करपद्धती आणि वापर<br>५. फॉरिन ट्रेड प्रॅक्टिसेस ॲण्ड प्रोसिजर्स<br>६. पर्यटन व प्रवास व्यवस्थापन<br>७. जाहिरात विक्रिवृद्धिकला आणि विक्री व्यवस्थापन<br>८. कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स |
| विज्ञान : | १. इंडस्ट्रिअल केमिस्ट्री (सेव्हन स्ट्रीम्स)<br>२. फूड सायन्स ॲण्ड क्वॉलिटी कंट्रोल<br>३. क्लिनिकल न्यूट्रिशन डायटेटिक्स<br>४. इंडस्ट्रिअल मायक्रोबायॉलॉजी<br>५. बायोटेक्नॉलॉजी<br>६. बायोलॉजिकल टेक्निक ॲण्ड स्पेसिमेन प्रिपरेशन<br>७. सीड टेक्नॉलॉजी<br>८. सेरिकल्चर |

९. इंडस्ट्रिअल फिश अ‍ॅण्ड फिशरी
१०. इन्स्टुमेंटेशन
११.ऑप्टिकल इन्स्ट्रुमेंटेशन
१२. जिओएक्सप्लोरेशन अ‍ॅण्ड ड्रिलिंग टेक्नॉलॉजी
१३. मास कम्युनिकेशन व्हिडिओ प्रॉडक्शन
१४. स्टिल फोटोग्राफी अ‍ॅण्ड ऑडिओ प्रॉडक्ट्स
१५. सॉइल कॉन्झर्व्हेशन अ‍ॅण्ड वॉटर मॅनेजमेंट

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान :

१. इलेक्ट्रॉनिक इक्विपमेंट मेंटेनन्स
२. कॉम्प्यूटर मेंटेनन्स
३. इलेक्ट्रिकल इक्विपमेंट मेंटेनन्स
४. एन्व्हायरन्मेंट अ‍ॅण्ड वॉटर मॅनेजमेंट
५. ग्रामीण तंत्रज्ञान
६. ऑटोमोबाइल मेंटेनन्स
७. रिफ्रिजरेशन अ‍ॅण्ड एअरकंडिशनिंग मेंटेनन्स
८. बांधकाम तांत्रिक व्यवस्थापन
९. निर्मितिप्रक्रिया

**आंतरराष्ट्रीय सहभागावर आधारित कार्यक्रम**

अमेरिका, ब्रिटन, इंग्लंड, जर्मनी आणि जपान या देशांतील विद्यापीठांच्या सहभागाने चालणारे अनेक कार्यक्रम या विद्यापीठात सुरू आहेत. या कार्यक्रमांत कला, विज्ञान, भाषा या विद्याशाखांतील अनेक विषयांचा समावेश आहे.

**७. विद्यापीठाची व्याप्ती :**

विद्यापीठातील विभाग, संस्था, केंद्रे, अध्यासने आणि इतर घटकांची यादी :

**(अ) विभाग :**

१. प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार
२. मानवशास्त्र
३. वातावरण व अवकाशशास्त्र
४. आयुर्वेद
५. जैवतंत्रज्ञान
६. वनस्पतिशास्त्र
७. संस्कृत प्रगत अध्ययन क्रेंद्र

८. ललितकला केंद्र
९. रसायनशास्त्र
१०. वाणिज्यशास्त्र विभाग आणि संशोधन केंद्र
११. संज्ञापन व वृत्तपत्रविद्या
१२. संज्ञापन अभ्यास
१३. संगणकशास्त्र
१४. संरक्षण व सामरिकशास्त्र
१५. अर्थशास्त्र
१६. शिक्षणशास्त्र
१७. इलेक्ट्रॉनिक - सायन्स
१८. इंग्रजी
१९. पर्यावरणशास्त्र
२०. परकीय भाषा
२१. भूगोल
२२. भूमाहितीशास्त्र
२३. भूशास्त्र
२४. हिंदी
२५. इतिहास
२६. उपकरणशास्त्र
२७. विधि
२८. ग्रंथालय व माहितीशास्त्र
२९. व्यवस्थापनशास्त्र
३०. मराठी
३१. गणित
३२. सूक्ष्मजीवशास्त्र
३३. पाली
३४. तत्त्वज्ञान
३५. भौतिकशास्त्र
३६. राज्यशास्त्र व लोकप्रशासन
३७. मानसशास्त्र

३८. संस्कृत-प्राकृत भाषा
३९. समाजशास्त्र
४०. संख्याशास्त्र
४१. प्राणिशास्त्र

**(ब) शाळा आणि केंद्रे :**

४२. ॲकडेमिक स्टाफ कॉलेज
४३. बायोइन्फर्मेटिक्स सेंटर
४४. बुद्धिस्ट स्टडीज आणि आंबेडकर विचारप्रणाली
४५. सेंटर फॉर इन्फर्मेशन ॲण्ड नेटवर्क सिक्युरिटी
४६. सेंटर फॉर मॉडेलिंग ॲण्ड सिम्युलेशन
४७. स्पर्धा परीक्षा केंद्र
४८. इन्स्टिट्यूट ऑफ बायोइन्फर्मेटिक्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी
४९. आंतरविद्याशाखा केंद्र (विज्ञान)
५०. आंतरविद्याशाखा केंद्रे (मानव्यविद्या आणि समाजशास्त्र)
५१. नॅशनल सेंटर फॉर फ्री रॅडिकल रिसर्च (एन.सी.एफ.आर.आर.)
५२. नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी ॲण्ड डिफेन्स अनॅलिसिस
५३. स्कूल ऑफ बायोमेडिकल सायन्स
५४. स्कूल ऑफ एनर्जी स्टडीज
५५. स्कूल ऑफ हेल्थ सायन्स
५६. स्कूल ऑफ सायंटिफिक कॉम्प्युटिंग
५७. स्त्री अभ्यास केंद्र

**(क) स्वायत्त घटक :**

५८. सेंटर फॉर नेटवर्क कॉम्प्युटिंग
५९. एज्युकेशनल मल्टिमीडिया रिसर्च सेंटर
६०. आय एस आर ओ सेल
६१. सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क

**(ड) इतर कार्यालयीन आणि सेवा घटक :**

६२. क्रीडा मंडळ
६३. आंतरराष्ट्रीय केंद्र
६४. राष्ट्रीय सेवा योजना
६५. विद्यार्थी कल्याण मंडळ

**(इ) अध्यासने :**

१. एअर पॉवर नॅशनल सिक्युरिटी स्टडीज
२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन
३. जैवतंत्र अध्यासन
४. सी.एस. आय. आर/ आय.पी.आर. अध्यासन
५. छत्रपती शिवाजी अध्यासन
६. डी. एस. सावकार अध्यासन
७. जैन अध्यासन
८. आय.एस.आर.ओ./ स्पेस चेअर
९. लोकमान्य टिळक अध्यासन
१०. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन
११. महात्मा गांधी अध्यासन
१२. महात्मा फुले अध्यासन
१३. पद्मश्री विखे-पाटील अध्यासन
१४. पंडित भीमसेन जोशी अध्यासन
१५. एस. एल. किर्लोस्कर अध्यासन
१६. संत ज्ञानदेव अध्यासन
१७. संत नामदेव अध्यासन
१८. संत तुकाराम महाराज अध्यासन
१९. स्टेट बँक अध्यासन
२०. स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन

**फ) विद्यापीठ परिसरातील नामवंत संस्था :**

१. सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅड्व्हान्स्ड कॉम्प्युटिंग (सी-डॅक)
२. इंटर-युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अॅस्ट्रॉनॉमी अॅण्ड अॅस्ट्रोफिजिक्स (आयुका)
३. नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस (एन.सी.सी.एस.)
४. नॅशनल सेंटर फॉर रेडिओ अॅस्ट्रॉनॉमी (एन.सी.आर.ए.)
५. विद्यापीठ अनुदान आयोगाचे पश्चिम विभागीय कार्यालय
६. वैकुंठलाल मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (व्ही.ए.एम.एन.आय.सी.ओ.एम.)

**शैक्षणिक सहकार्य :**

विविध शैक्षणिक संस्थांशी विद्यापीठाचे संबंध आहेत. त्यामुळे विद्यापीठाला आपल्या परिसरात विशेष विषयांना वाहिलेली पदव्युत्तर शैक्षणिक शिबिरे आयोजित करता येतात. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो. त्या संस्था पुढीलप्रमाणे :

१. भाभा ॲटोमॅटिक रिसर्च सेंटर (बी.ए.आर.सी.)
२. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मीटिऑरॉलॉजी (आय.आय.टी.एम.)
३. इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (आय.एस.आर.ओ.)
४. इंडियन मीटिऑरॉलॉजी विभाग (आय.एम.डी.)
५. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एन.सी.एल.)
६. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग मॅनेजमेंट (एन.आय.बी.एम.)
७. नॅशनल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूट (एन.ए.आर.आय.)
८. नॅशनल जिऑलॉजिकल रिसर्च इन्स्टिट्यूट (एन.जी.आर.आय.)
९. ऑइल ॲण्ड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओ.एन.जी.सी.)

**ठळक वैशिष्ट्ये :**

- 'नॅक'कडून पंचतारांकित दर्जा प्राप्त.
- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून एक सर्वोत्कृष्टतेची क्षमता असलेले विद्यापीठ (यू.पी.ई.) म्हणून गौरव.
- संलग्न महाविद्यालयांच्या विकासासाठी व गुणवत्तासुधार कार्यक्रमांसाठी विद्यापीठाच्या नीधीतून आर्थिक साहाय्य.
- 'आय.एस.ओ. ९००१ : २०००'कडून वित्त व लेखा विभागास दर्जेदार कार्यासाठी प्रशस्तिपत्रक
- विद्यापीठातील तज्ज्ञ व उद्योजक यांच्यातील परस्परसंवाद व सहकार्यास प्रारंभ
- विद्यापीठातील विभागांमध्ये पदव्युत्तर स्तरावर श्रेणी गुणांकन पद्धतीचा अवलंब
- विभागांमध्ये परिस्थितीअनुरूप करारपद्धती व संयुक्तपद्धतीने कर्मचाऱ्यांच्या नेमणुका
- बौद्धिक स्वामित्व हक्क या योजनेचा विकास व अवलंब
- अद्यायावत संगणकीकृत ग्रंथालय प्रकल्प प्रारंभ
- इन्फोनेट या कार्यक्रमाला प्रारंभ
- ग्रंथालयामध्ये रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन टेक्नॉलॉजीचा प्रारंभ
- परीक्षा विभाग व इतर महत्त्वाच्या दस्तांबाबत अंकपद्धतीचा अवलंब करण्यास प्रारंभ
- फिस्ट आणि कॅस कडून खास निधी
- विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांकरिता संशोधन प्रकल्पासाठी आठशे कोटी रु. तरतूद
- आविष्कार या राज्यस्तरीय संशोध प्रकल्प स्पर्धेत पुणे विद्यापीठ चौथ्या वर्षी सलग विजयी
- १२५ महाविद्यालयांमध्ये व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रमास प्रारंभ
- १५ मूलभूत घटकांवर आधारित व नियोजित समर्थ भारत अभियान कार्यक्रमास प्रारंभ
- क्रांतिज्योती सावित्रीमाता फुले शिष्यवृत्ती योजना सुरू केली.

# पुणे विद्यापीठ
## गोषवारा (ABSTRACT)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ स्थापना दिवस | १० फेब्रुवारी, १९४९ | | |
| २. | आवाराचे एकूण क्षेत्रफळ | ४११ एकर | | |
| ३. | पहिले कुलगुरू | डॉ. एम.आर.जयकर | | |
| ४. | विद्यापीठातील एकूण विभागांची /केंद्रांची संख्या | ६१ | | |
| ५. | कार्यक्षेत्र : जिल्हे ३ | पुणे | अहमदनगर | नाशिक |
| | : संलग्न महाविद्यालये -६१३ | ३६४ | १०९ | १४० |
| ६. | मुलींसाठी महाविद्यालये - २० | १४ | ०२ | ०४ |
| ७. | अ) मान्यताप्राप्त संशोधन संस्था - २२८ | १७८ | १९ | ३१ |
| | ब) पदव्युत्तर केंद्रे - १७५ | १४० | १७ | १८ |
| | क) इतर संस्था - २३ | | | |
| ८. | प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | महाविद्यालयीन | | बहिःस्थ |
| | अ) पदवीपूर्व | ३,४१,०२५ | | ५०,८३३ |
| | ब) पदव्युत्तर | विद्यापीठ विभाग | महाविद्यालयीन | बहिःस्थ |
| | | ६,६४८ | ५६,३७० | ५५,६२५ |
| | क) एम.फिल. (प्राप्त | २८५ (पुरुष १७०+स्त्रिया ११५) | | |
| | ड) पीएच.डी. (प्राप्त) | २२९ (पुरुष १४४ + स्त्रिया ८५) | | |
| ९. | शिक्षक : | | | |
| | अ) विद्यापीठ विभाग | ३३४ | | |
| | ब) महाविद्यालये | ११,०१८ | | |
| १०. | विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी | | | |
| | वर्ग १ | ५० | | |
| | वर्ग २ | ३२ | | |
| | वर्ग ३ | ५५७ | | |
| | वर्ग ४ | २७१ | | |
| ११. | विद्यापीठ घेत असलेल्या परीक्षा | ऑक्टोबर | एप्रिल | |
| | | २८२ | ३९६ | |
| १२. | विद्याशाखा | १३ | | |
| १३. | अभ्यासमंडळे | ११२ | | |
| १४. | तदर्थ मंडळे | ५९ | | |
| १५. | जयकर ग्रंथालयातील पुस्तके आणि नियतकालिके | ४,७८,७७४ | | |

**जिल्हानिहाय आणि विद्याशाखानिहाय विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांच्यामधील शैक्षणिक सत्र २००९–२०१० मधील विद्यार्थ्यांची संख्या**

**पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा**

| शाखा | पुणे विद्यापीठ | | | पुणे जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| कला व ललितकला, मानस, नीती व सामाजविज्ञान | १९०५ | १७४९ | ३६५४ | ३८५६२ | २१२२७ | ५९७८९ |
| विज्ञान | १०७९ | १०२२ | २१०१ | १८६७३ | १३२८७ | ३१९६० |
| विधि | ६८ | ७० | १३८ | ८६२३ | २३५८ | १०९८१ |
| वैद्यक | – | – | – | – | – | – |
| अभियांत्रिकी | – | – | – | ३३२०५ | २७३९८ | ६०६०३ |
| आयुर्वेद | – | – | – | – | – | – |
| होमिओपॅथी | – | – | – | – | – | – |
| वाणिज्य | ६७ | २६ | ९३ | ३७५३६ | २७५२६ | ६५०६२ |
| शिक्षणशास्त्र / शारीरिक शिक्षणशास्त्र | ७२ | ७२ | १४४ | २३५९ | २५९६ | ४९५५ |
| औषधनिर्माणशास्त्र | – | – | – | २१३५ | १०१८ | ३१५३ |
| व्यवस्थापन | ३५० | १६८ | ५१८ | १२३५७ | ९५६३ | २१९२० |
| **एकूण** | **३४४१** | **३२०७** | **६६४८** | **१५३४५०** | **१०४९७३** | **२५८४२३** |

## जिल्हानिहाय आणि विद्याशाखानिहाय विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांच्यामधील शैक्षणिक सत्र २००९-२०१० मधील विद्यार्थांची संख्या

## अहमदनगर आणि नाशिक जिल्हा

| शाखा | अहमदनगर जिल्हा | | | नाशिक जिल्हा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| कला व ललितकला, मानस, नीती व सामाजविज्ञान | २६५३१ | १७८३८ | ४४३६९ | २८६३५ | २०१२५ | ४८७६० |
| विज्ञान | ७५१२ | ५६३५ | १३१४७ | ७५६३ | ४२१५ | ११६८८ |
| विधि | १२५८ | ८६१ | २११९ | २७५६ | १२५९ | ४०१५ |
| वैद्यक | - | - | - | - | - | - |
| अभियांत्रिकी | ७४५४ | ४२५७ | ११७१० | ११५४६ | ८६५३ | २०१९९ |
| आयुर्वेद | - | - | - | - | - | - |
| होमिओपॅथी | - | - | - | - | - | - |
| वाणिज्य | २१३३२ | १६५३९ | ३६८७१ | १५९२१ | १२३५९ | २८२८० |
| शिक्षणशास्त्र / शारीरिक शिक्षणशास्त्र | ५९६ | ९५१ | १५४७ | १२०८ | १८५६ | ३०६४ |
| औषधनिर्माणशास्त्र | १४२८ | ८५६ | २२८४ | २१७३ | १६३९ | ३८१२ |
| व्यवस्थापन | २८९३ | १४९६ | ४३८९ | ५४८७ | २६८९ | |
| **एकूण** | **६९००४** | **४८४३२** | **११७४३६** | **७५२८९** | **५२७०५** | **१२७९९४** |

## जिल्हानिहाय विद्याशाखानिहाय
## महाविद्यालयांची संख्या (२००९-२०१०)

| शाखा | पुणे | अहमदनगर | नाशिक | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. कला | ८ | १० | ७ | २५ |
| २. कला व विज्ञान | ७ | ७ | ४ | १८ |
| ३. कला व वाणिज्य | ३७ | ७ | २१ | ६५ |
| ४.कला, विज्ञान व वाणिज्य | ६४ | ३३ | ३६ | १३३ |
| ५. विज्ञान व वाणिज्य | ८ | २ | ४ | १४ |
| ६. वाणिज्य | ५७ | ३ | ५ | ६५ |
| ७. विज्ञान | १८ | १ | ४ | २३ |
| ८.वैद्यक (फक्त पदव्युत्तर) | _ | _ | - | _ |
| ९. औषधनिर्माणशास्त्र | २९ | ६ | १३ | ४८ |
| १०. होमिओपॅथी | _ | _ | - | _ |
| ११.आयुर्वेद (फक्त पदव्युत्तर) | _ | _ | - | _ |
| १२. विधि | १६ | ५ | ४ | २५ |
| १३. अभियांत्रिकी | ५२ | ८ | १२ | ७२ |
| १४.वास्तुशास्त्र | ८ | २ | ३ | १३ |
| १५. शिक्षणशास्त्र | ५७ | २३ | २६ | १०६ |
| १६.शारीरिक शिक्षण | ३ | २ | १ | ६ |
| १७.युनानी वैद्यक | _ | _ | - | - |
| १८.मुद्रण अभियांत्रिकी व ग्राफिक्स | _ | _ | - | - |
| **एकूण** | **३६४** | **१०९** | **१४०** | **६१३** |

**विद्याशाखानिहाय महिला महाविद्यालये :**

**वाणिज्य : १**

**कला व वाणिज्य : ३**

**कला, विज्ञान व वाणिज्य : ७**

**वास्तुशास्त्र : १**

**औषधनिर्माणशास्त्र : १**

**शिक्षणशास्त्र : ४**

**अभियांत्रिकी : ३**

❑❑